# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमूद केलेल्या पदाच्या मुलाखती दिनांक १ ते ३ जून, २०१६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. चालू रिक्त पदे व अनुशेष भरती या दोन्ही जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या व चाळणी परीक्षेतून अर्हताप्राप्त ठरलेल्या सामाईक उमेदवारांची संख्या विचारात घेऊन सदर मुलाखतीच्या कार्यक्रमात खालील प्रमाणे बदल करण्यात आला आहे. सामाईक उमेदवारांची एकदाच मुलाखत घेण्यात येईल व त्यांचा विचार चालू रिक्त व अनुशेषाच्या दोन्ही पदांसाठी करण्यात येईल. उमेदवारांना sms व प्रोफाईलमध्ये पत्र पाठविण्यात येतील. ज्या उमेदवारांना पत्र प्राप्त होणार नाहीत अशा उमेदवारांनी आयोगाच्या ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग कुपरेज, मुंबई – ४०० ०२१ येथील मुख्य कार्यालयात संपर्क साधावा.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ११/२०१५ व १२/२०१५ | औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई, गट - ब | १ व २ जून, २०१६ स. ९.४५ वा. |

विचाराधीन पदाच्या मुलाखतीस पात्र ठरणा-या सर्व उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळेस आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे सादर करण्याकरिता मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त पदाची मुलाखत ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग कुपरेज, मुंबई – ४०० ०२१ येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात येईल.

दिनांक १८ मे, २०१६

विवेक शं. देशमुख
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.